# महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ


४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स,
नरीमन पॉईन्ट,
मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी : (०२२) २०२ ८३ ०४
२०२ ६२ ४९, २८३ ७२ ४७
तार : पाणी मंडळ
फॅक्स : (९१) ०२२-२०२ ९३४८


जावक क्र. सभा/मुप्रअ/1097/सभा – 71/आ. 4

दिनांक : 18/3/97

विषय :– दिनांक 12/3/97 रोजी संपन्न झालेल्या मंडळाच्या 71 व्या सभेचे इतिवृत्त.

महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाची 71 वी सभा, बुधवार दिनांक 12/3/97 रोजी सकाळी 11 वाजता मंडळाचे अध्यक्ष व मा.. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली त्यांचे दालनात मंत्रालय, मुंबई –32 येथे संपन्न झाली. सदर बैठकीचे इतिवृत्त सोबत मंजूरीसाठी सादर करीत आहे.

(राजेंद्र मा. सगणे) १८/३/९७.
सदस्य सचिव

मंडळाचे सदस्य व प्रधान सचिव,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई. 32

मंडळाचे मा. उपाध्यक्ष व राज्यमंत्री नगर विकास तथा
पा.पु.व स्व. विभाग, मंत्रालय, मुंबई. 32

मंडळाचे मा. अध्यक्ष व मंत्री,
पा.पु.व स्व.विभाग, मंत्रालय, मुंबई. 32

# महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळ.

## दिनांक 12/3/97 (बुधवार) रोजी संपन्न झालेल्या मंडळाच्या 71 व्या सभेचे इतिवृत्त.

महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाची 71वी सभा बुधवार दिनांक 12/3/97 रोजी सकाळी 11.00 वाजता मंडळाचे अध्यक्ष तथा मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या अध्यक्षतेखाली त्यांचे दालनात मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली. सदर सभेस मंडळाचे खालिल सदस्य उपस्थित होते.

1. मा.नामदार श्री.अण्णासाहेब डांगे, अध्यक्ष, महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळ व मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, मंत्रालय, मुंबई.

2. श्री. व्ही.रंगनाथन, सदस्य, महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळ व प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.

3. श्री.राजेंद्र सगणे, सदस्य सचिव, महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळ.

4 श्री.रा.तु. अिल्हे, उप सचिव, वित्त विभाग.
(श्री.व्यंकटचारी, सदस्य, महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळ व अप्पर मुख्य सचिव, वित्त विभाग यांचे प्रतिनिधी.)

5. श्रीमती शैलजा घरत, उप सचिव, उद्योग.
(श्री.विनय बन्सल, सदस्य, महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळ व सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई च्या प्रतिनिधी.)

6. श्री.अरुण घाटे, उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग.
(श्री.रामानंद तिवारी, सदस्य, महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळ व सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे प्रतिनिधी.)

मंडळाच्या सभेस उपस्थित राहू न शकलेल्या सदस्यांच्या रजेस मंजूरी देण्यात आली.

महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाचे खालिल अधिकारी विशेष निमंत्रीत म्हणून उपस्थित होते.

1. श्री.शं.दाँ. अरमाळ, मुख्य अभियंता (कोंकण विभाग)
2. श्री.सु.का. पाटील, मुख्य अभियंता (नाशिक विभाग)
3. श्री. नि.कृ.माडा, मुख्य प्रशासकीय अधिकारी.
4. श्री.भा.आ. डोंगरे, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी.

मंडळाचे सदस्य सचिव श्री.राजेंद्र सगणे यांनी प्रथम माननीय नामदार श्री.अण्णासाहेब डांगे, अध्यक्ष, महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळ व उपस्थित सदस्यांचे स्वागत केले. नंतर, सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

**कार्यक्रम बाब क्र. 1** : 70व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.

मंडळाने प्रस्तृत केलेल्या इतिवृत्तावर कोणत्याहि सदस्यांची सुचना वा आक्षेप आले नसल्याने इतिवृत्तास मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.2** : मंडळाच्या 70व्या सभेतील बाबींवर करण्यात आलेली कृती.

मंडळाच्या 70 व्या सभेचे इतिवृत्त मंजूर करुन घेयून ते संबंधितांना कार्यवाहीसाठी पाठविण्याकरिता थोडा उशिर झाला. सबब या सभेतील मंजूर झालेल्या कार्यक्रम बाबींवर कार्यवाही करण्यास पुरेसा अवधी न मिळाल्याने, कृती करण्यात आलेली नाही. सबब 70व्या सभेतील मंजूर कार्यक्रम बाबींवरील केलेली कृती मंडळाच्या पुढील (72) सभेत ठेवण्याचे मा.अध्यक्षांच्या निदर्शनास आणून दिले व यास सभेने मान्यता दिली.

**कार्यक्रम बाब क्र.3** : सन 1994–95 च्या वार्षिक अहवालास (वार्षिक लेखे व लेखा परिक्षण अहवाल) मान्यता देणे.

मंडळाच्या सन 1994–95 चा वार्षिक अहवाल सभेपुढे ठेवण्यात येवून अहवालाबाबतची पार्श्वभूमी मंडळाचे सदस्य सचिव यांनी सभेपुढे ठेवली. त्यानंतर अहवालावर सविस्तर चर्चा होऊन अहवालास सभेत एकमताने मान्यता देण्यात आली व खालील प्रमाणे ठराव मंजूर करण्यात आला.

ठराव :

असे ठरविण्यात आले आहे की, मंडळाने 1994–95 या वर्षाच्या वार्षिक अहवालास मान्यता दिली असून तो शासनाच्या विधान मंडळाच्या व विधान परिषदेच्या सभागृहापुढे ठेवण्यासाठी पाठविण्याचा प्राधिकार सदस्य सचिव यांना देण्यांत येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र. 4** : सन 1996–97 मध्ये नागरी पाणी पुरवठा व जलनिःसारण योजनांसाठी आयुर्विमा महामंडळाकडून योजनांमार्फत कर्ज उभारणी.

सदर बाब मंडळाचे सदस्य सचिव यांनी वाचून दाखविली. मंडळाचे वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी यांनी सभेपुढे आयुर्विमा महामंडळाकडून नागरी योजनांतील कर्ज उभारण्याच्या आवश्यकतेबाबतची माहिती सभेपुढे विषद केली यावर सभेत विस्तृत चर्चा होवून सदर कार्यक्रम बाबीस मान्यता देण्यात आली व खालिल प्रमाणे ठराव मंजूर करण्यात आला.

ठराव :

असा ठराव करण्यात येतो की, आयुर्विमा महामंडळाचे पत्र क्र. आयएनव्ही/ पीएस/ डी दिनांक 3.3.97 ( परिशिष्ट 'अ' ) अन्वये मंजूर करण्यात आलेले कर्ज रु. 1882.80 लक्ष कर्ज उभारणी सदर पत्रासोबत जोडण्यात आलेल्या अटी व शर्तीनुसार व्हावी व मंडळाची सामान्य मुद्रा ( कॉमन सील ) उठवून आयुर्विमा महामंडळास करारनामा सादर करण्यासाठी मंडळाचे सदस्य सचिव / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांना अधिकृत करण्यांत येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र. 5 :** अधीक्षक अभियंता, परिसर अभियांत्रिकी मंडळ, औरंगाबाद यांचे कार्यालयाचा, पुर्वीप्रमाणेच मंजूर पदांचा, आकृतीबंध कायम ठेवणेबाबत.

सदर कार्यक्रम बाब मंडळाचे सदस्य सचिव यांनी विस्तृतपणे सभेपुढे मांडली त्यावर सर्व बाजूंनी विचार होवून या विषयावर स्वतंत्र बैठक आयोजित करण्यात यावी असे सभेत ठरले व सुचनेप्रमाणे लवकरच बैठक आयोजित करण्यात येत आहे. त्यावेळी कर्मचारी संघटनांचे प्रतिनिधींनाही बोलावण्याचे ठरले.

**कार्यक्रम बाब क्र. 6 :** ग्रामीण व नागरी भागात पिण्याच्या योजनांबाबत आराखडा तयार करण्यासाठी आस्थापित केलेल्या मंत्री मंडळ उप समितीचा अहवाल 'ग्रामीण पाणी पुरवठा व कार्यक्रमांतर्गत नियंत्रण'.

वरील बाबीवर चर्चा करताना सदस्य सचिवांनी शासन निर्णयानुसार अंमलबजावणी करताना येणा–या अडचणी, निविदांचे देकार जास्त येणे, कामांच्या किंमती त्यासाठी लागणा–या साहित्यासह धरल्यामुळे जास्त असल्याने ठेकेदारांच्या नोंदणीचा वर्ग वरच्या दर्जाचा लागल्याने स्पर्धात्मक निविदा प्राप्त न होणे, इत्यादि बाबी सविस्तर विषद केल्या. याबाबत प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी असे प्रतिपादन केले की, सर्वसाधारणपणे कोणताही बदल संबंधिताच्या अंगवळणी पडेपर्यंत वर उल्लेख केल्याप्रमाणे अडचणी येतीलच व शासनाने घेतलेला निर्णय मंत्री मंडळ उपसमितीने सर्व बाबींचा सारासार आणि सर्वकश विचार करुन घेतलेला असल्याने त्यात कोणताही बदल प्रस्तावित करणे उचित ठरणार नाही, म्हणून असा निर्णय घेण्यात आला की, आहे तीच पध्दत चालू ठेवावी.

याच कार्यक्रम बाबीवर चर्चा करीत असताना मा.मंत्री, ग्राम विकास तसेच पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी असे प्रतिपादन केले की, मंडळाकडील ठेकेदारांची नोंदणी करण्यास अवाजवी वेळ लागतो आणि त्यामुळे या पध्दतीत अधिक सुलभता व शिघ्रता आणण्याची आवश्यकता आहे.

यावर खुलासा करताना सदस्य सचिव तसेच मुख्य अभियंता, कोकण विभाग यांनी सांगितले की, ब–याच वेळा ठेकेदारांकडून प्राप्त होणारे अर्ज हे अचूक व परिपूर्ण नसतात त्यामुळे आवश्यक ती माहिती ठेकेदाराकडून पुन्हा प्राप्त होईपर्यंत मंडळास त्यांचे अर्जावर कार्यवाही करणे शक्य होत नाही आणि त्यामुळेच ठेकेदाराच्या नोंदणीस अवाजवी वेळ लागतो असा समज होतो. तरीही ठेकेदारांच्या नोंदणीसाठी अकारण अवाजवी वेळ लागणार नाही अशी काळजी घेण्याच्या सुचना सर्व संबंधीतांना देण्यात येतील.

वरील प्रमाणे चर्चा होऊन कार्यक्रम बाब नामंजूर करण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.7 :** चिखलदरा पाणी पुरवठा योजनेवर अत्यावश्यक सेवेत असणा- या कर्मचा--यांकरिता निवासस्थानाची तरतुद करणेबाबत.

चिखलदरा पाणी पुरवठा योजनेवर अत्यावश्यक सेवेत असणा–या कर्मचा--यांकरिता निवासस्थानाची तरतुद करण्याबाबतची कार्यक्रम बाब मंडळाचे सदस्य सचिव यांनी सभेपुढे विषद केली. यावर प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी असे सुचविले की, चिखलदरा येथील प्रस्तावित निवासस्थानांसाठीची जागा मंडळाच्या मालकीची असेल तरच निवासस्थाने बांधण्यास परवानगी देता येईल. यावर अध्यक्षांनी व सभेतील सदस्यांनी मान्यता दर्शविली व खालील प्रमाणे ठराव मंजूर करण्यात आला.

<u>ठराव</u> :

असा ठराव करण्यांत येतो की, चिखलदरा पाणी पुरवठा योजनेवर अत्यावश्यक सेवेत असणा–या कर्मचा–यांकरिता निवासस्थाने बांधण्याची प्रस्तावित जागा ही मंडळाच्या मालकीची असून त्याबाबतच्या सर्व मूळ ( भूमापन रजिस्टर व 7/12 मध्ये ) कागदपत्रामध्ये तशी नोंद घेण्यात आली आहे याची खातरजमा करुन ती जागा मंडळाच्या नांवे असल्यास या जागेवर अत्यावश्यक सेवेतील कर्मचा–यांच्या निवासस्थानांसाठी लागणा–या रु.27.81 लाख निव्वळ व रु.32.68 लाख ढोबळ इतक्या रकमेच्या तरतूदीस मान्यता देण्यात येत आहे. याबाबतचे सर्व अधिकार मंडळाचे सदस्य सचिव यांना देण्यात येत आहेत.

**<u>कार्यक्रम बाब क्र. 8</u> :** <u>यवतमाळ येथे नुकत्याच निर्माण करण्यात आलेल्या अधीक्षक अभियंता कार्यालयांकरिता इमारत बांधणेबाबत.</u>

सदर बाब मंडळाचे सदस्य सचिव यांनी सभेपुढे विस्तृतपणे विषद केली व सभेच्या असे निदर्शनास आणून दिले की, यवतमाळ येथे नव्याने निर्माण करण्यात आलेल्या अधीक्षक अभियंता कार्यालयांकरिता इमारतीची आवश्यकता असून या कार्यालयासाठी यवतमाळ येथे शासकीय तसेच खाजगी जागा ( इमारत ) उपलब्ध नाही. त्यामुळे यवतमाळ येथे मंडळाच्या मालकीच्या असलेल्या जागेवर जे विभागीय कार्यालय आहे त्यावरच मजले चढवून मंडळ कार्यालयाकरिता इमारत बांधणे सोयीचे व कमी खर्चाचे होईल. यावर सभेने असे सुचविले की, सदर जागा ही मंडळाचीच आहे याची पुन्हा एकदा खातरजमा करावी. तसेच ही जागा यवतमाळ पाणी पुरवठा योजनेची असल्यास प्रथम ती 'महा जिवन प्राधीकरणाच्या' नांवे करुन मगच या प्रकरणी कार्यवाही करावी असे ठरवून खालिल प्रमाणे ठराव मंजूर करण्यांत आला.

<u>ठराव</u> :

यवतमाळ शहरात अधीक्षक अभियंता कार्यालयाकरिता शासकीय इमारत उपलब्ध नसल्यामुळे मंडळाला स्वतःची इमारत बांधणे गरजेचे आहे. यवतमाळ येथे विभाग क्र.1 ची, एकूण 246 चौ.मिटर क्षेत्रफळ असलेली इमारत आहे. ही इमारत मंडळाच्याच मालकीची असून या बाबतचे सर्व दस्तऐवज रजिस्टर नोंद व 7/12 मध्ये जागा मंडळाच्या नांवे दर्शविले असल्याची खात्री करुन मगच या इमारतीवर एक मजला चढवून तेथे अधीक्षक अभियंता यांचे कार्यालय उघडणे संयुक्तिक व योग्य ठरेल. म्हणून अधीक्षक अभियंता, परिसर अभियांत्रिकी मंडळ, यवतमाळ यांचेसाठी कार्यालय बांधणे या कामाकरिता रु. 12.57 लक्षाची तरतुद 'कार्यालयीन इमारत' या लेखाशिर्षामधून करणेबाबत व इमारत बांधण्याबाबतचे सर्व अधिकार सदस्य सचिव यांना देण्यात येत आहेत.

मंडळाचे रुपांतर 'महाराष्ट्र जीवन प्राधीकरण' असे झाल्याने मंडळाचे नांवावर असलेल्या सर्व जागांचे बाबत मूळ भूमापन रजिस्टर व 7/12 चे उता–यात, 'महाजीवन प्राधीकरण' असा बदल करुन घेण्यात यावा.

– [illegible] –

**<u>टेबल बाब क्रमांक 1</u> :** <u>महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाचे सन 1996–1997चे सुधारित अंदाजपत्रक 1997–98 चे प्रस्तावित अंदाजपत्रक यास मान्यता देणे.</u>

मंडळाच्या सन 1996–97 या वर्षाच्या सुधारित अंदाजपत्रक व 1997–98 चे प्रस्तावीत अंदाजपत्रकासंबंधी माहिती मंडळाचे वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी विषद केली. परंतू हा विषय अभ्यासण्यास सदस्यांना वेळ मिळावा म्हणून मा.अध्यक्षांनी असे सूचविले की, अंदाजपत्रकाचा अभ्यास करुन सखोल चर्चा करण्यासाठी दिनांक 30.3.97 रोजी सकाळी 10.00 वाजता स्वतंत्र बैठक घेण्यात यावी त्याप्रमाणे दिनांक 30.3.97 रोजी सकाळी 10.00 वाजता बैठक घेण्याचे ठरले

**टेबल बाब क्रमांक 2 :** महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाच्या, प्रकल्प क्षेत्राबाहेरच्या, पाणी पुरवठा केंद्रातून होणा–या पाणी पुरवठयाचे दर ( 1997–1998 साठी ) सुधारित करण्याबाबत.

मंडळाचे सदस्य सचिव यांनी महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाकडून प्रकल्प क्षेत्राबाहेरच्या पाणी पुरवठा केंद्रातून होणा–या पाणी पुरवठयासाठी, सन 1996–97 या वर्षी अपेक्षित पाणी पुरवठा खर्च व उत्पन्न यांची माहिती देऊन सन 1997–98 वर्षासाठी अंदाजित खर्चाचा आढावा घेता पाणी पुरवठयाचे दरात वाढ होणे कसे आवश्यक आहे हे सदस्यांच्या निदर्शनास आणून दिले व विद्यमान दर 15 टक्केनी वाढविण्याचे प्रस्तावित आहे असे सांगितले. यावर चर्चा होऊन कार्यक्रम बाब मंजूर करण्यांत आली.

प्रस्ताव मंजूर करताना प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी निदर्शनास आणले की, ग्रामीण क्षेत्रासाठी होणा–या पाणी पुरवठयाच्या दरात मंडळाने काहीही वाढ प्रस्तावित केलेली नाही. त्या दरात देखील 10 टक्केनी वाढ करावी म्हणजे ठोक पुरवठयासाठीचा रु. 1.80 प्रति 1000 लिटर हा दर रु. 2.00 इतका करावा व किरकोळ पुरवठयासाठीचा रु.2.00 प्रति 1000 लिटर्स हा दर रु.2.20 प्रति 1000 लिटर्स इतका करावा. त्यानंतर खालिल प्रमाणे ठराव संमत करण्यांत आला.

**ठराव :** मंडळ असा ठराव करीत आहे की, मंडळाच्या ग्राहकांसाठी करावयाच्या पाणी पुरवठयाचे दर दिनांक 1.5.1997 किंवा सदस्य सचिव ठरवतील त्या दिनांकापासून खालिल प्रमाणे असतील.

| अ.क्र. | ग्राहकाचा तपशील | दर पैशात प्रति 1000 लिटर | |
|---|---|---|---|
| | | विद्यमान | प्रस्तावित |
| 1. | घाऊक घरगुती पाणी पुरवठा : | | |
| अ. | घरगुती. | | |
| 1. | महा.राज्य विद्युत मंडळाची देयके परस्पर 140 भरणा–या नगरपालिकांनी केलेला घाऊक पाणी पुरवठा. | 140 | 160 |
| 2. | महा.राज्य.विद्युत मंडळाकडे विद्युत देयके न भरणा–या इतर नगरपरिषदांना केलेला पाणी पुरवठा. | 400 | 460 |
| 3. | मंडळाच्या मुख्य वितरण नलिकेमधून प्रतिमहा 2 द.ल.लि. पेक्षा जास्त पाणी घेणारे घरगुती ग्राहक. | 400 | 460 |
| 4. | ग्रामीण क्षेत्रासाठी मंडळाचे पा.पु.केंद्रातून होणारा ठोक पुरवठा. | 180 | 200 |
| ब. | बिगर घरगुती पाणी पुरवठा | 2000 | 2300 |
| 2. | किरकोळ पाणी पुरवठा | | |
| अ. | घरगुती | 415 | 475 |
| ब. | बिगर घरगुती | | |
| | 1. 'क' वर्ग नगरपालिका क्षेत्राखेरीज होणारा पाणी पुरवठा. | 2000 | 2300 |
| | 2. 'क' वर्ग नगरपालिका क्षेत्रात प्रतिमहा 2 द.ल.लि. पर्यंत पाणी घेणा–या ग्राहकांसाठी केलेला पाणी पुरवठा ( 'क' वर्ग नगरपालिका | 1000 | 1150 |

| | | | |
|---|---|---|---|
| | क्षेत्रात प्रतिमहा 2 द.ल.लि. पेक्षा जास्त पाणी घेणा--या ग्राहकांना वरील 1--ब प्रमाणे दर आकारण्यात येईल ) | | |
| 3. | शाळा महाविद्यालये, शासकीय-निमशासकीय कार्यालये, धर्मादाय संस्था, सरकारी रुग्णालये आणि ना नफा तत्वावर चालणा--या संस्था. | 830 | 955 |
| 4. | ग्रामीण क्षेत्रासाठी मंडळाचे मालकीचे पाणी पुरवठा केंद्रातून होणारा किरकोळ पुरवठा. | 200 | 220 |
| 4. | विशेष ग्राहक. 1) लष्करी कारखान्यांना करावयाचा शुध्द पाणी पुरवठा. | | |
| | अ. अंबाझरी | 830 | 955 |
| | ब. ओझर | 830 | 955 |
| | क. अणुशक्ती केंद्र, तारापूर. | 830 | 955 |
| 5. | गिरीस्थाने | | |
| | 1. घरगुती | 440 | 505 |
| | 2. बिगर घरगुती | 2500 | 2875 |

6. मापन यंत्र असलेल्या नळ जोडासाठी किमान आकार :

एखाद्या महिन्यात पाण्याचा वापर विहित किमान प्रमाणापेक्षा कमी असेल तर खालील प्रमाणे किमान दर आकारला जाईल.

( रु. लाखात )

| नळ जोडाचा आकार | थेट घरगुती वापरासाठी प्रति नळ जोडास प्रतिमास. | | ना नफा तत्वावर चालणा--या संस्था ज्या वरील ठरावातील अ.क्र.3 मध्ये दर्शविल्या आहेत. त्या संस्थांना प्रति नळास प्रतिमास. | | बिगर घरगुती वापरासाठी दर प्रति नळ जोडास प्रतिमास. | |
|---|---|---|---|---|---|---|
| | विद्यमान | प्रस्तावित | विद्यमान | प्रस्तावित | विद्यमान | प्रस्तावित |
| 15 मि.मि. | 40 | 46 | 84 | 97 | 199 | 228 |
| 20 मि.मि. | 81 | 93 | 168 | 193 | 398 | 457 |
| 25 मि.मि. | 159 | 183 | 337 | 388 | 795 | 914 |
| 32 मि.मि. | 239 | 275 | 504 | 580 | 1193 | 1372 |
| 40 मि.मि. | 324 | 373 | 670 | 770 | 1590 | 1828 |
| 50 मि.मि. | 398 | 458 | 837 | 963 | 1987 | 2285 |
| 65 मि.मि. | 516 | 593 | 1091 | 1254 | 2585 | 2973 |

7. मापनयंत्र नसलेल्या नळ जोडसाठी किमान आकार :

अ) ज्या नळ जोडास मापन यंत्र बसविले नसेल अशा ठिकाणी नळ जोडाच्या आकारावरुन खालीलप्रमाणे मासिक किमान आकार ( Flat Rates ) आकारला जाईल.

( दर रुपयात )

| नळ जोडाचा आकार | घरगुती वापरासाठी दर प्रति नळ जोडास प्रतिमास | | ना नफा तत्वावर चालणा-या संस्था ज्या वरील ठरावातील अ.क्र.3 मध्ये दर्शविल्या आहेत अशा संस्थांसाठी प्रति नळ जोडास प्रतिमास | | बिगर घरगुती वापरासाठी दर प्रति नळ जोडास प्रतिमास. | |
|---|---|---|---|---|---|---|
| | विद्यमान | प्रस्तावित | विद्यमान | प्रस्तावित | विद्यमान | प्रस्तावित |
| 15 मि.मि. | 92 | 106 | 185 | 213 | 472 | 543 |
| 20 मि.मि. | 185 | 213 | 371 | 427 | 1042 | 1198 |
| 25 मि.मि. | 371 | 427 | 743 | 854 | 1886 | 2169 |

ब.) बसविलेले मापनयंत्र 3 महिन्यापेक्षा अधिक काळापासून चालू नसेल अशा नळ योजना 3 महिन्यात वापरलेल्या पाण्याची सरासरी किंवा मापनयंत्र नसलेल्या नळ जोडासाठी असलेले वरील किमान दर यातील जी जास्त रक्कम असेल ती रक्कम आकारण्यात येईल.

25 मि.मि. पेक्षा जास्त आकाराचे नळ जोड फक्त मापनयंत्रासह जोडण्यात येतील. विभागीय अधिका-यांनी 25 मि.मि. पेक्षा जास्त आकाराच्या नळ जोडासाठी मापनयंत्र बसविल्याशिवाय पाणी पुरवठा करु नये.

8. <u>ठोक पाणी पुरवठयासाठी किमान आकार :</u>

ठोक पाणी पुरवठयासाठी किमान आकार करार पत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे राहातील. तसेच हा किमान दर 2 द.ल.लि. पाणी पुरवठयाच्या आकारापेक्षा कमी असणार नाही.

9. <u>मापनयंत्र नसलेल्या सार्वजनिक नळ जोडासाठी आकार :</u>

अ. मापनयंत्र नसलेल्या प्रत्येक सार्वजनिक नळ जोडास प्रतिमास रु. 550.00

ब. मापनयंत्र असलेल्या सार्वजनिक नळ जोडाच्या बाबतीत त्याची देखभाल करणे ही ग्राहकांची जबाबदारी राहील. जर अशी मापनयंत्रे तीन महिन्यापेक्षा जास्त काळ चालू नसतील तर, तीन महिन्यात वापरलेल्या पाण्याची सरासरी किंवा मापनयंत्र नसलेल्या सार्वजनिक नळ जोडासाठी असलेला दर यातील जी रक्कम जास्त असेल ती रक्कम आकारण्यात येईल.

10. <u>विलंबित प्रदान विषयक आकार :</u>

असेही नमूद करण्यात येत आहे की, प्रत्येक ग्राहकास देयक निर्गमित केलेल्या दिनांकापासून 30 [illegible]

आकार, देयक मिळालेल्या तारखेपासून 30 दिवसानंतरच्या कालावधीसाठी द्यावा लागेल. जे ग्राहक सलग सहा महिन्याच्या देयकाचा भरणा करणार नाहीत त्यांचा पाणी पुरवठा बंद करण्यात येईल.

**टेबल कार्यक्रम बाब क्र.3 :—** महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाच्या प्रकल्प क्षेत्रातील पाणी पुरवठा केंद्रातून होणा–या पाणी पुरवठयाचे, सन 1997–98 या वर्षाकरिता, सुधारित दर आकारण्याबाबत :

प्रस्तावाबाबत सदस्य सचिवांनी माहिती दिली व प्रकल्प क्षेत्रासाठी देखील विद्यमान दर 15 टक्क्यांनी वाढविण्याचे प्रस्तावित असल्याचे सांगितले. यावर चर्चा होऊन प्रस्तावास एकमताने मान्यता देण्यांत आली व खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला.

ठराव :

मंडळ असा ठराव करीत आहे की, प्रकल्प क्षेत्रातील खालील संयोजन धारकासाठी पाणी पुरवठा दराची वाढ दि.1.5.1997 पासून किंवा सदस्य सचिव ठरवतील त्या तारखेपासून करुन खालीलप्रमाणे सुधारीत दर आकारावेत.

| अ.क्र. | ग्राहकांचा तपशिल. | दर प्रति 1000 लिटर (रुपयांत) | |
|---|---|---|---|
| | | विद्यमान. | प्रस्तावित. |
| 1. | ठोक पुरवठा. | | |
| | 1. घरगुती. | 3.20 | 3.70 |
| | 2. टेमघर पाणी पुरवठा योजनेंतर्गत असलेले ग्रामीण क्षेत्र. | 1.80 | 2.00 |
| | 3. बिगर घरगुती. | 13.80 | 15.85 |
| 2. | किरकोळ पाणी पुरवठा. | | |
| | 1. घरगुती. | 3.45 | 3.95 |
| | 2. बिगर घरगुती. | 15.55 | 17.90 |
| | 3. ग्रामीण क्षेत्रास. | 2.00 | 2.20 |
| 3. | शाळा, महाविद्यालये, शासकीय–निमशासकीय कार्यालये, शासकीय दवाखाने, धर्मादाय संस्था व इतर ना नफा तत्वावर चालणा–या संस्था. | 7.20 | 8.25 |
| 4. | विशेष ग्राहक (आयुधे निर्मिती कारखाने). | 6.60 | 7.60 |

5. मापन यंत्रे असलेल्या नळजोडासाठी किमान आकार.

मापन यंत्राद्वारा होणा–या पाणी पुरवठयाचे किमान दर हे मासिक वापरास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्तावित आहेत. (संख्या रुपयामध्ये)

| संयोजन नलीकेचा व्यास. | किरकोळ घरगुती पुरवठा वर, प्रतिमास प्रति संयोजन. | | ना नफा तत्वावर चालणा–या संस्था (प्रारुप ठरावातील अ.क्र. 3 मध्ये नमूद केल्याप्रमाणे) प्रतिमास प्रति संयोजन. | | किरकोळ बिगर घरगुती पुरवठा वर प्रतिमास प्रति संयोजन. | |
|---|---|---|---|---|---|---|
| | विद्यमान | प्रस्तावित | विद्यमान | प्रस्तावित | विद्यमान | प्रस्तावित |
| 15 मि.मि. | 62 | 71 | 144 | 166 | 279 | 321 |
| 20 मि.मि. | 114 | 131 | 266 | 306 | 518 | 595 |
| 25 मि.मि. | 166 | 191 | 386 | 444 | 745 | 857 |
| 30 मि.मि. | 248 | 285 | 580 | 667 | 1119 | 1287 |
| 40 मि.मि. | 435 | 500 | 1015 | 1167 | 1955 | 2248 |
| 50 मि.मि. | 550 | 632 | 1280 | 1472 | 2473 | 2844 |
| 65 मि.मि. | 673 | 774 | 1570 | 1806 | 3034 | 3489 |

[illegible] आकारावर

[illegible] प्रस्तावित आहेत.

(संख्या रुपयांत)

| संयोजन नलिकेचा व्यास. | सरसकट दर प्रति संयोजन, प्रतिमास घरगुती किरकोळ पुरवठयाकरिता. | | ना नफा तत्वावर चालणा–या संस्थांकरिता सरसकट दर. (प्रारुप ठरावातील अ.क्र.3 मध्ये नमूद केल्याप्रमाणे). | | सरसकट दर प्रति संयोजन, प्रतिमास किरकोळ बिगर घरगुती पुरवठयासाठी. | |
|---|---|---|---|---|---|---|
| | विद्यमान | प्रस्तावित | विद्यमान | प्रस्तावित | विद्यमान | प्रस्तावित |
| 15 मि.मि. | 84 | 97 | 166 | 191 | 373 | 429 |
| 20 मि.मि. | 144 | 167 | 291 | 335 | 661 | 760 |
| 25 मि.मि. | 301 | 346 | 601 | 691 | 1346 | 1548. |

ब) ज्या ग्राहकांची मापन यंत्रे तीन महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी नादुरुस्त असतील अशा ग्राहकांना तीन महिन्याच्या सरासरी वापरानुसार किंवा विनामापन यंत्र संयोजन आकारणी (वरिलप्रमाणे) यामध्ये जो जास्त आकार असेल तो लावण्यांत येईल.

25 मि.मि. वरिल संयोजनाचा पाणी पुरवठा फक्त जलमापन यंत्राद्वारे असेल. विभागीय अधिका–यांनी 25 मि.मि. पेक्षा जास्त संयोजनांना विना जलमापन यंत्र, पाणी पुरवठा करु नये.

7. घाऊक पाणी पुरवठयासाठी किमान आकार.

घाऊक पुरवठयासाठी, करारातील अटी व शर्तीनुसार किमान मासिक आकारणी केली जाईल. तथापि सदर किमान आकारणी दोन द.ल.लि. पाणी पुरवठयापेक्षा कमी असणार नाही.

8. सार्वजनिक नळजोडांना किमान आकार.

अ) प्रत्येक जलमापन यंत्र विरहीत सार्वजनिक नळ जोडासाठी रु. 476/– दरमहा.

ब) जर नळजोड जलयंत्रासहित असेल तर जलयंत्र बसविण्याची व देखभालीची जबाबदारी मालकाची राहील. जर जलयंत्र तीन महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी नादुरुस्त असेल तर मागील तीन महिन्याच्या सरासरी वापरावर किंवा जलयंत्र विरहित सार्वजनिक नळाची आकारणी यामधील जो जास्त दर असेल त्याप्रमाणे आकारणी केली जाईल..

9. विलंब आकारणी.

जे ग्राहक देयक निर्गमित केलेल्या दिनांकापासुन 30 दिवसांच्या आंत पाणीपट्टी आकारणी (थकबाकीसहित) भरणार नाहीत, अशा ग्राहकांना देयक निर्गमित केलेल्या दिनांपासुन ज्या दिवशी 30 दिवस संपतील त्या दिनांकापासुन सर्व थकीत रकमेवर 1.5 टक्के दरमहा दराने विलंब आकार लावण्यांत येईल. जे ग्राहक सतत सहा महिने विलंब आकार भरण्याचे टाळतील, त्यांचा पाणी पुरवठा खंडीत केला जाईल.

10. सुधारित दराच्या अंमलबजावणीसाठी उच्च न्यायालयाकडून आवश्यक ती परवानगी मिळविण्यासाठी सदस्य सचिवांना प्राधिकृत करण्यांत येत आहे.

**टेबल बाब क्र.4** :– मंडळाच्या न्हावा शेवा पाणी पुरवठा केंद्रातून होणा–या पाणी पुरवठयासाठी सन 1997–98 सालाकरिता सुधारित दर आकारण्याबाबत.

या बाबीवर सविस्तर चर्चा होऊन दर वाढविण्याची आवश्यकता लक्षात घेऊन सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला.

ठराव :

मंडळ असा ठराव करीत आहे की, न्हावा शेवा पाणी पुरवठा केंद्रातून होणा–या पाणी पुरवठयाचे खाली नमूद केलेले दर दिनांक 1.5.1997 किंवा सदस्य सचिव ठरवतील त्या दिनांकापासून लागू करण्यांत येतील.

| (1) | पाणी पुरवठयाचा प्रवर्ग. | विद्यमान पव प्रति 1000 लि. | प्रस्तावित दर प्रति 1000 लि. |
|---|---|---|---|
| 1) | सिडकोला ठोक पुरवठा. | रु. 5.10 | रु. 5.85 |
| 2) | पनवेल नगरपरिषद. | | |
| | 1. ग्रामीण. | रु. 1.80 | रु. 1.80 |
| | 2. नागरी. | रु. 5.65 | रु. 6.50 |
| 3) | ज.ने.पोर्ट ट्रस्ट व इतर ग्राहक. | रु. 10.00 | रु. 11.50 |

(2) विलंब आकार :

जे ग्राहक देयक निर्गमित केलेल्या दिनांकापासून 30 दिवसांच्या आंत पाणीपट्टी आकारणी (थकबाकीसहित) भरणार नाहीत, अशा ग्राहकांना देयक निर्गमित केलेल्या दिनांकापासून ज्या दिवशी 30 दिवस संपतील त्या दिनांकापासून सर्व थकीत रकमेवर 1.5 टक्के दरमहा दराने विलंब आकार लावण्यांत येईल. जे ग्राहक सतत सहा महिने विलंब आकार भरण्याचे टाळतील त्यांचा पाणी पुरवठा खंडीत केला जाईल.

**टेबल बाब क्र.5** :– जालना येथे मंडळाच्या मालकीच्या सर्व्हे नं. 488 मधील जागेवर विभागीय कार्यालय, विश्रामगृह व कर्मचा–यांची निवासस्थाने बांधण्याबाबत.

या बाबीवर प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी असे सूचित केले की, बांधकाम सुरु करण्यापूर्वी ती जागा मंडळाच्याच मालकीची आहे याची खातरजमा करावी व नसल्यास प्रथम जागा मंडळाच्या (आता महाराष्ट्र जीवन प्राधीकरणाच्या) नावाने योग्य त्या नोंदणी रजिस्टर व 7/12 उता–यामध्ये बदल करुन, करुन घेण्यांत यावी. या सूचनेसह एकमताने कार्यक्रम बाब खालीलप्रमाणे ठरावासह मंजूर करण्यांत आली.

ठराव :

जालना येथील प्रस्तावित मंडळाच्या मालकीच्या सर्व्हे नं. 488 मधील (क्षेत्र 1.52 हेक्टर) जागेमध्ये एकूण 1348 चौ.मिटर बांधकाम क्षेत्रात पहिल्या टप्प्यात रु. 29,14,350/– अंदाजित खर्चाची कार्यालये, कार्यकारी अभियंता निवासस्थान व विश्रामगृह आणि दुस–या टप्प्यात रु. 31,48,950/– अंदाजित खर्चाची वर्ग–1 ते वर्ग–4 पर्यंतच्या कर्मचा–यांची निवासस्थाने अशी एकूण रु. 60,63,300/– अंदाजित खर्चाची बांधकामे, प्रस्तावित जागा ही मंडळाच्याच मालकीची असून भूमापन रजिस्टर व 7/12 मध्ये जागा महाराष्ट्र जीवन प्राधीकरणाचे नांवे असल्याची खातरजमा करुन मगच बांधकाम करण्यास मान्यता देण्यांत येत आहे. याबाबतचे सर्व अधिकार मंडळाचे सदस्य सचिव यांना देण्यांत येत आहेत.

**टेबल बाब क्र.6** :– महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाच्या नागपूर विभागातील सर्व कार्यालयांसाठी नागपूर येथे इमारत बांधणेबाबत.

ही बाब सविस्तरपणे सभेपुढे ठेवल्यानंतर नागपूर परिसरातील सरकारी जागेचा तुटवडा व खाजगी जागेच्या भरमसाठ किंमती लक्षात घेता, नागपूर शहरातील मंडळाची विविध कार्यालये, सध्याच्या काटकसरीच्या धोरणाचा विचार करुन एकाच इमारतीमध्ये आणण्यांत यावीत, त्यासाठी मंडळाच्या मालकीच्या जागेत कार्यालये बांधण्याच्या कार्यक्रम बाबीस मान्यता देण्यांत येत असून त्याबाबत खालीलप्रमाणे ठराव करण्यांत येत आहे.

**ठराव :**

नागपूर शहरात असलेली मंडळाची सर्व कार्यालये, तेलंगखेडी येथे असणाऱ्या मंडळाच्या मालकीच्या जागेत, अस्तित्वातील बॅरॅक्समध्ये असलेल्या इमारती पाडून तेथे नवीन इमारत बांधून, कार्यरत केल्यास प्रशासकीय दृष्ट्या समन्वय व संनियंत्रणाच्या अनुषंगाने उपयुक्त ठरणार आहे. तथापि इमारतीसाठीची तेलंगखेडी येथील प्रस्तावित जागा ही मंडळाच्या मालकीची असून त्याबाबतची नोंद भूमापन रजिस्टर व 7/12 मध्ये घेण्यांत आल्याची खातरजमा करुन (व जागा आता महाराष्ट्र जीवन प्राधीकरणाचे नावाने रजिस्टर करुन) घेतल्यानंतरच तेलंगखेडी येथे मंडळाची इमारत बांधण्याच्या रु.2,39,16,000/– खर्चाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत असून यासाठी निधीचा आवश्यक ती तरतुद " कार्यालयीन इमारत " या लेखाशिर्षाखाली करुन इमारत बांधण्याचे सर्व अधिकार सदस्य सचिवांना देण्यांत येत आहेत.

**टेबल बाब क्र.7** :– चंद्रपूर येथे, अधीक्षक अभियंता यांचेसाठी, निवासस्थान बांधणेबाबत.

ही बाब मंडळाचे सदस्य सचिव यांनी सभेपुढे विस्तृतपणे विषद केल्यानंतर चंद्रपूर येथे अधीक्षक अभियंता यांना स्वतंत्र निवासस्थानाची आवश्यकता लक्षात घेऊन सभेत ही बाब मंजूर करण्यांत आली व खालीलप्रमाणे ठराव करण्यांत आला.

**ठराव :**

चंद्रपूर शहरात शासकीय या खाजगी निवासस्थान उपलब्ध नसल्याने मंडळाच्या मालकीच्या जागेवर एकूण 103.07 चौ.मीटर क्षेत्रफळ असणारे निवासस्थान अधीक्षक अभियंता, चंद्रपूर यांचेसाठी बांधण्याच्या रु. 8,21,500/– खर्चाच प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. परंतू रामनगर येथील प्रस्तावित जागा ही मंडळाच्याच मालकीची असून त्याबाबतची नोंद भूमापन नोंद रजिस्टर व 7/12 मध्ये घेण्यांत आली आहे याची खातरजमा करुन घेण्यांत यावी. तसेच मंडळाचे नांव "महाराष्ट्र जीवन प्राधीकरण" असे रेकॉर्डमध्ये बदलून घ्यावे. या खर्चासाठी निधीची तरतूद " मंडळाच्या इमारती " या मंडळाच्या लेखाशिर्षांतर्गत करुन नियमानुसार निवासस्थान बांधण्याचे सर्व अधिकारी सदस्य सचिवांना प्रदान करण्यांत येत आहेत.

**टेबल बाब क्र.8** :– निविदांना काही जिल्हयातून प्रतिसाद मिळत नसल्याने नोंदणीप्रत ठेकेदारांची संख्या वाढविणेबाबत.

या बाबीवर मंडळाच्या 70 व्या सभेत निर्णय घेण्यांत आल्याने सभेतून ही बाब वगळण्यांत आली.

**टेबल बाब क्र.9 :--** बीड येथे मंडळाच्या मालकीच्या भूमापन क्र.30 क मधील जागेवर विभागीय कार्यालय, उप विभागीय कार्यालय, विश्रामगृह व कर्मचा--यांची निवासस्थाने बांधणेबाबत.

ही बाब मंडळाचे सदस्य सचिव यांनी सभेपुढे विषद करुन बीड येथे कार्यालयाच्या बांधकामाची आवश्यकता उपस्थित सभासदांच्या निदर्शनास आणून दिली. यावर चर्चा होऊन असे ठरविण्यांत आले की, जर प्रस्तावित जागा मंडळाच्या मालकीची असेल तर प्रस्तावानुसार कार्यालये, विश्रामगृह व कर्मचारी निवासस्थाने बांधण्यास हरकत नाही. यास एकमताने सहमती दर्शविण्यांत येवून खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आला.

ठराव :

मंडळाने बीड येथील विभागीय कार्यालयाच्या मालकीच्या भूमापन क्र.30 (क) मधील (क्षेत्र 8,300 चौ.मी.) जागेमध्ये एकूण 941.903 चौ.मी.बांधकाम क्षेत्रात पहिल्या टप्प्यात रु. 42,38,200/-- अंदाजित खर्चाची कार्यालये, विश्रामगृह व वर्ग--1 निवासस्थान आणि दुस--या टप्प्यात रु. 31,49,000/-- अंदाजित खर्चाची वर्ग--2, वर्ग--3 व वर्ग--4 पर्यंतच्या कर्मचा--यांची निवासस्थाने असे एकूण रु. 73,87,200/-- अंदाजित खर्चाची बांधकामे करण्यास व निधी उपलब्धतेनुसार कामे करुन घेण्यास परवानगी देण्यांत येत आहे. तथापि प्रस्तावित जागा ही मंडळाच्या मालकीची असून त्याबाबतची नोंद भूमापन रजिस्टर व 7/12 मध्ये घेण्यांत आली आहे याची खात्री करुन घेऊन व आता रेकॉर्डमध्ये मंडळाचे नांव " महाराष्ट्र जीवन प्राधीकरण " असे बदलून घेवून प्रस्तावित बांधकाम करुन घेण्यास मंडळाचे सदस्य सचिव यांना अधिकार देण्यांत येत आहेत.